वित्तीय मान्यतेबाबत..

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष ३४५१ २९६२ खालील शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ८० % चे मर्यादेत तरतुदी वितरीत करण्यास मान्यता बाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : आकृवि-०४१७ /प्र.क्र.१५१/१५-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८.

वाचा: १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/ १२-अ, दि.२३ सप्टेंबर,२०११.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७.
४) शासन निर्णय, कृषि व पदुम. विभाग, सम क्रमांक, दिनांक २९/०७/२०१७.
५) शासन निर्णय, कृषि व पदुम. विभाग, सम क्रमांक, दिनांक ३०/११/२०१७.
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६/०२/२०१८.

शासन निर्णय :-

राज्य शासनातील सेवेत असलेल्या सर्व स्तरातील अधिकारी व कर्मचा-यांची कार्यक्षमता वाढवुन गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याबाबत राज्य शासनाने दिनांक २३/९/२०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण जाहिर केले.

या नुसार, तांत्रिक प्रशिक्षणाचा आराखडा विभागाने तयार केला असुन हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम, योजनातंर्गत योजनेतुन राबवायचा आहे. यासाठी क्षेत्रियस्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांच्या वर्गवारी नुसार तांत्रिक प्रशिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी, शासकिय कर्मचा-यांना प्रशिक्षण ही योजना (योजनातंर्गत) प्रस्तावित करण्यात आली असुन त्यानुसार विभागाच्या अर्थसंकल्पात सन २०१७-१८ करिता **रू २५.०० लाख,** अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ७०% चे मर्यादेत तरतूदी वितरीत करण्यास संदर्भाधीन दिनांक ३०/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त नमुद **लेखाशिर्ष ३४५१ २९६२,** शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण करिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या (**रू. २५.०० लाख**) **८०%** चे मर्यादेत तरतुद रूपये **रू.२०,००,०००/-** (**रूपये वीस लाख फक्त**) तरतुद वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मंजूर प्रयोजनासाठीच खर्च करण्यात येईल, याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर केलेल्या अनुदानातून खालील लेखाशिर्षाखाली करण्यात यावा.

मागणी क्रमांक डी-७
३४५१**,** सचिवालयीन आर्थिक सेवा,
(००) (००३) प्रशिक्षण, (००) (०१) शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (कृषि)
(३४५१ २९६२), (१००**%** राज्य पुरस्कृत योजना)
५०, इतर खर्च

४. हे आदेश, वित्त विभागाचे परिपत्रक, क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७ मधील निदेशानुसार व वित्त विभाग**,** शासन परिपत्रक**,** क्र. अर्थसं -२०१७/ प्र.क्र.९४/अर्थ-३**,** दि.३०/०६/२०१७ मधील अटी व शर्तीचे अनुपालन यांचे अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८०३०१११२७५०४४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकिंत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh
Madhukar
Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab3986 5278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.03.01 11:29:47 +05'30'

(उ.म.मदन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल -१/२, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
४) कृषि संचालक, (आत्मा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) कृषि सहसंचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) उप सचिव (२अे) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
८) उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) उप सचिव (व्यय-१/अर्थसंकल्प-१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) सर्व, संचालक/सह संचालक, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
११) सर्व, विभागीय कृषि सहसंचालक मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१२) सर्व, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१४) निवडनस्ती -१५अे.